**सामाजिक वनीकरण :** या याजनेअंतर्गत जिल्हयात १९८७-८८ पर्यंत १८४ गावांत १,९८३ हेक्टर क्षेत्रात साग व सुबाभळीची लागवड झाली. किसान रोपवाटिका योजने द्वारे शेतक-यांकडून रोपे तयार करुन जनतेला वितरित केली जातात. वर्धा, हिंगणघाट, चिकणी, दहेगाव, खरांगणा, आर्वी, आष्टी, कारंजा, जोगापूर आणि पुलगावला रोपवाटिका आहेत. त्यात सुबाभूळ, रेन-ट्री, शिसू, निलगिरी, पेल्टोफोरम, बांबू, गुलमोहर, अशोक ही झाडे तसेच फळझाडांची रोपे तयार करतात. शासनाने निकृष्ट प्रतीची जंगले सुधारण्यासाठी पडीत जमीन विकास कार्यक्रम सुरु केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळाने वर्धा येथे वन प्रकल्प विभाग १५ डिसेंबर १९८७ पासून सुरु केला.

## प्राणीसृष्टी

**वन्य प्राणी :** जिल्हयातील जंगले लहान लहान भागात विखुलेली असल्यामुळे वन्य प्राण्यांना पुरेसे संरक्षण मिळत नाही. उत्तरेकडील जंगलात आणि बोर अभयारण्यात चित्ते, रानटी मांजर, मुंगूस, कोल्हे, नीलगाय, अस्वले, सांबर, चितळ आणि रानटी डुक्कर इत्यादी वन्य प्राणी तसेच काळया तोंडाचे माकड लहान लहान कळपांत आढळतात. लाल तोंडाचे माकड या जिल्हयात आढळत नाही.

**वन्य पक्षी :** वन्य पक्ष्यांमध्ये हुमा, करक, मोर, तितीर हे पक्षी आढळतात.

**बोर अभयारण्य :** या अभयारण्याची स्थापना १९७० मध्ये करण्यात आली. त्याचे एकूण क्षेत्रफळ ६१.१० चौ. कि. मी. असून त्यापैकी २८.७३ चौ. कि. मी. संरक्षित आणि ३२.३७ चौ. कि. मी. राखीव वन आहे. या ठिकाणी चित्ता, निलगाय, सांबर, चितळ, रानडुक्कर, अस्वल, जंगली कुत्रे, रान मांजर इत्यादी वन्य प्राणी व मोर पक्षी आढळतात. सन १९८३-८४ मध्ये झालेल्या वाघांच्या शिरगणतीनुसार जिल्हयातील जंगलात सहा चित्ते आणि दोन वाघ होते.

बोर धरण येथे हौसी पर्यटकांना राहण्यासाठी एक निवास कुटी आहे. या अभयारण्याच्या विकासासाठी १९८३-८४ पर्यंत १०,२३,१९० रुपये खर्च करण्यात आले.

**मासे व मत्स्यव्यवसाय :** वर्धा, वेणा आणि धाम या बारमाही वाहणा-या नद्या असून जिल्हयातील नद्यांची एकूण लांबी ४३० कि. मी. आहे. त्याशिवाय बोर धरण, केळझर तलाव, नाचणगावचा देव तलाव, आर्वीचा सांगपूर तलाव, आष्टीचा कपिले वर तलाव आणि पोथरा जलाशय हे प्रमुख जलसाठे आहेत. लहानमोठया तलावांची एसूण संख्या १०४ असून त्यांचे जलक्षेत्र ३,५०० हेक्टर आहे. हे तलाव ग्रामपंचायती, जिल्हा परिषद अथवा पाटबंधारे विभागाव्या मालकीचे आहेत. बहुसंख्य म्हणजे ६५ तलाव हंगामी व ३७ बारमाही असून त्यांचे जलक्षेत्र अनुक्रमे ७३० व १,०४० हेक्टर आहे. केवळ दोन तलाव मोठे असून त्यांचे जलक्षेत्र १,७०० हेक्टर आहे. जिल्हयातील माशांच्या जाती पुढीलप्रमाणे आहेत.

| शास्त्रीय नाव | स्थानिक नाव |
|---|---|
| १. Carps and Barbs | |
| **Family-Cyprinidae** | |
| Chela atpar (Ham.) | बोंकांसो |
| Oxygaster clupeoides (Bl.) | चेला |
| Rasbora daniconius (Ham.) | कन्हेरी |
| Danio devario (Ham.) | डुथ्री |
| Puntius ticto (Ham.) | करवडी |
| Puntius sophore (Ham.) | पतीह |
| Puntius kolus (Sykes) | कोळशी |
| Puntius sarana (Ham.) | पोष्टी |
| Obsteobrama vigrosii (Sykes) | पोष्टी |
| Tor tor (Ham.) | वारीस |
| Cirrhinus reba (Ham.) | रेवळी |
| Labeo fimbriatus (Bl.) | तांबीर |
| Labeo calbasu (Ham.) | कानाशी |
| Labeo bata (Ham.) | बाटा, नवरी |
| Labeo boggut (Sykes) | गोहरीया |
| Labeo rohita (Ham.) | रोहू |
| Catla catla (Ham.) | कटला |
| २. **Razor fishes** | |
| **Family-Notopteriade** | |
| Notopterus notopterus (Pallas) | पातुळा |
| Notopterus chitala (Ham) | चीतळ |
| ३. **Loaches** | |
| **Family-Cobitiidae** | |
| Lepidocephalichthys guntea (Ham.) | गुरगुटेची |
| Noemacheilus botia (Ham.) | तेलीन |
| ४. **Catfishes** | |
| **Family-Siluridae** | |
| wallago attu (Schn.) | शीरडा, सरवडा |
| Ompak bimaculatus (Bl.) | गुंगा माची |
| **Family-Saccobranchidae** | |
| Heteropneustes fossilis (Bl.) | सिंचन |

| शास्त्रीय नाव | स्थानिक नाव |
|---|---|
| **Family-Clariidae** | |
| Clarias batrachus (L.) | वागूर |
| **Family-Bagaridae** | |
| Mystus aor (Ham.) | सिंघरी |
| Mystus seenghala (Sykes) | शींगटा |
| **Family-Sisoridae** | |
| Bagarius bagarius | वाढ |
| ५. **Eels** | |
| **Family-anguillidae** | |
| Anguilla bengalensis (G and v.) | तेंबू मच्छी |
| ६. **Garfishes** | |
| **Family-Belonidae** | |
| Xenetodon cancila (Ham.) | चाचा मच्छी |
| ७. **Mullets** | |
| **Family-Mugilidae** | |
| Rhinomugil corsula (Ham.) | अरवडी, वारडोरी |
| ८. **Snake-heads or Murrels** | |
| **Family-Ophocephalidae** | |
| Channa striatus (Bl.) | ढोक |
| Channa marulius (Ham.) | फुल मुरेल |
| Channa gachua (Ham.) | बिलोना |
| Channa punctaus (Ham.) | बोटरी |
| ९. **Perches** | |
| **Family-nandidae** | |
| **Nandus nandus (Ham.)** | **डुक्कर मच्छी** |
| **Basdis (Ham.)** | |
| १०. **Glassfishes** | |
| **Family-Ambassidae** | |
| **Ambassis ranga (Ham.)** | **झंझाडी** |
| **Ambassis nama (Ham.)** | **चांदवा** |

| शास्त्रीय नाव | स्थानिक नाव |
|---|---|
| ११. **Gobies** | |
| **Family-Gobiidae** | |
| Glossogobius guiris (Ham.) | घसरा |
| १२. **Spiny eels** | |
| **Family-Mastocembelidae** | |
| Mastocembelus pancalus (Ham.) | बाम |
| Mastocembelus armatus (Lac.) | वैर |

जिल्हयात ५,००० मासेमारी करणारे लोक असून त्यापैकी १,५०० पूर्णवेळ मच्छीमार आहेत. कोळयांच्या पोटजातींची नावे पुढीलप्रमाणे :- धोनियार, भोई, केवट,पालावर भोई, भनारी,मच्छिंद्र,बेंदोरा, झिंगाभोई आणि बसतला.

बोर आणि केळझरला मत्स्यबीज निर्माण केंद्रे शासनाने सुरु केली आहेत. मत्स्य विकासाद्वारे मासेमारांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी एक योजना आखण्यात आली असून तिला वर्धा योजना म्हणतात. त्यानुसार केळझर व बोर प्रेक्षत्रांची वाढ करुन ग्रामपंचायतींच्या अखत्यारीतील तलावांची दुरुस्ती करण्यासाठी कर्ज देण्यात येतेञ मत्स्यबिजाचे गुणन करण्यासाठी आधारभूत बीज कलकत्याहून आणतातञ सहकाराद्वारे विकास करण्यास्तव २१ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेतञ शासकीय सवलतीच्या या संस्था लाभ उठवतात. तथापि त्यांच्या कार्याची व्याप्ती अथवा भांडवल अत्यल्प आहे.

**तक्ता क्रमांक १**

**जिल्हयातील १८८८-८९ ते १८९३-९४ या वर्षातील पर्जन्यमान**

(पर्जन्यमान इंचात)

| महिना | सरासरी | १८८८-८९ | १८८९-९० | १८९०-९१ | १८९१-९२ | १८९२-९३ | १८९३-९४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जून | ७.०० | ६.२७ | ५.८३ | ५.३१ | ०.७६ | ४.२० | ६.०४ |
| जुलै | १५.०० | १६.५३ | १५.०४ | १५.०६ | २१.०६ | १७.८४ | ९.०२ |
| ऑगस्ट | ७.०० | ३.८२ | १२.२६ | ५.८५ | ४.१३ | ८.६१ | १२.४४ |
| सप्टेंबर | ७.५० | ३.२९ | ४.३६ | ९.०६ | २०.९३ | ७.९४ | ६.०६ |
| ऑक्टोबर | २.०० | ०.३७ | ६.०२ | ०.२३ | ०.८८ | ५.२७ | ४.३० |
| नोव्हेंबर डिसेंबर | ०.२५ | २.४७ | .. | २.०१ | .. | ०.०९ | २.८४ |
| जानेवारी फेब्रवारी | १.०० | .. | .. | १.७३ | ०.८३ | २.५५ | ०.१३ |
| वार्षिज | ४०.०० | ३३.७३ | ४४.४५ | ४०.२३ | ४८.६५ | ५२.७४ | ४१.१० |

**आधार : रिपोर्ट ऑ-ा दि लॅज्ड रेव्हे-यू सेटलमेंट ऑफ वर्धा डिस्ट्रिक्ट, १८९१-९४, पृ. ९.**